# **प्रवास**

वाहा हे ओझे दूर पाठीवर
मिळेल सुखाचा क्षण हातावर

पचव वेदना आधी दिनभर
मिळेल विसावा मग पळभर

धन गडगंज सत्ता देशावर
टिकणार जाणे कोण कोठवर

पदोपदी उभी निराशा समोर
तरीही प्रवास चाले आशेवर

– नारायण
०९/११/२३